

सत्यमेव जयते

**विधान भवन**
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२.

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक ८४३३ /म.वि.स./ई-२
दिनांक : 29 MAY 2026

**प्रति :**

**सर्व सन्मा. महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य/**
**सर्व सन्मा.महाराष्ट्र विधानसभा सदस्य.**

**विषय :- राज्यसभेच्या सन २०२६ मध्ये होणाऱ्या द्विवार्षिक निवडणुकींकरीता प्रस्थापित करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षाबाबत...**

**महोदय/महोदया,**

राज्यसभेच्या सदस्या श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांच्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे सदरहू रिक्त जागा भरण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने राज्यसभा पोट-निवडणूक, २०२६ चा कार्यक्रम घोषित केला आहे.

सदर निवडणुकीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दिनांक १ जून, २०२६ पासून ते निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत **कक्ष क्रमांक १२१, पहिला मजला**, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२ येथे **"नियंत्रण कक्ष"** प्रस्थापित करण्यात आला आहे.

आपली,

(स्वाक्षरी)

**(मेघना तळेकर)**
**सचिव - २,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**व**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

# राज्यसभा पोट-निवडणूक, २०२६

महाराष्ट्र विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांद्वारे घेण्यात येणाऱ्या राज्यसभेच्या पोट-निवडणुकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगामार्फत घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार पोट-निवडणुकीचा कार्यक्रम दिनांक १ जून, २०२६ पासून सुरु होत असून नामनिर्देशन पत्र सादर करावयाची मुदत दिनांक ८ जून, २०२६ पर्यंत आहे व आवश्यक असल्यास दिनांक १८ जून, २०२६ रोजी मतदान घेण्यात येणार आहे.

या निवडणुकीमध्ये मतदाराचे मत मिळविण्याच्या दृष्टीने त्याला रोख रक्कम किंवा वस्तू देऊन अनुचित प्रभाव निर्माण करणे, मुक्तपणे मताधिकार वापरताना मतदारांना कोणत्याही प्रकारच्या धमक्या देणे, जबरदस्ती करणे, मतदानामध्ये फायद्यासाठी राज्य यंत्रणेचा गैरवापर करणे, संबंधित मतदान अधिकारी/पोलीस अधिकारी यांची पक्षपाती वृत्ती किंवा अयोग्य वागणूक यांचा मतदानाच्या योग्यतेवर होणारा प्रतिकूल परिणाम इत्यादीसंदर्भात जनतेच्या तक्रारींकरीता भारत निवडणूक आयोगाच्या निदेशानुसार, उपरोक्त निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दिनांक १ जून, २०२६ पासून ते निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, **कक्ष क्रमांक १२१, पहिला मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२** येथे २४ X ७ तत्वावर "**नियंत्रण कक्ष**" प्रस्थापित करण्यात आला आहे. ज्या कोणास या निवडणुकीसंदर्भात तक्रार सादर करावयाची असेल त्यांनी उपरोक्त नियंत्रण कक्षात करावी.

**(मेघना तळेकर)**
**सचिव - २,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**व**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

\\MLS-E2-07\Data\ELECTION\RAJYA SABHA ELECTION\2026\Bye Election - 2026\Election Programme and Publication - Form 1 & Letter.doc

# Bye-Election to the Council of States, 2026

The Election Commission of India has declared a programme of Bye-Election to the Council of States by the elected members of the Maharashtra Legislative Assembly. Accordingly, the said programme of the Bye-Election is to commence from 1st June, 2026 and the last date of making nominations is 8th June, 2026. Also, the poll, if required, will be taken on 18th June, 2026.

In pursuance of the directions issued by the Election Commission of India, a 24x7 Control Room has been put into operation at **Room No. 121, First Floor, Vidhan Bhavan, Mumbai – 400032 from 1st June, 2026** till the completion of the electoral process in order to attend all complaints submitted by people with regard to but not restricted to undue influence by offering cash or kind to a voter with a view to getting his/her vote, any type of threats, coercion to voters in the free exercise of franchise, misuse of the state machinery for electoral gains, partisan attitude or unbecoming conduct of connected election officers/police officers adversely affecting the fairness of poll etc. Whoever wishes to submit a complaint in respect of the said election may submit the same in the aforementioned control room.

M Talekar

**(Meghana Talekar)**
**Secretary – 2,**
**Maharashtra Legislature Secretariat**
**and**
**Returning Officer.**